# घोडेगावात कांदा तीन हजारांपर्यंत

**नेवासा (प्रतिनिधी)–** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या घोडेगाव कांदा मार्केटमध्ये कांद्याची ४४ हजार ९९४ गोण्या आवक झाली. भाव तीन हजारांपर्यंत निघाले. एक-दोन लॉटला २९०० ते तीन हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला. मोठा कांदा २६०० ते २८०० रुपये, मुक्कल भारी २५०० ते २७०० रुपये, गोल्टा २३०० ते २६०० रुपये, गोल्टी २००० ते २४०० रुपये तर हलका डॅमेज व जोड कांद्याला १००० ते १४०० रुपये प्रतिक्किंटलचा भाव मिळाला.

नवी आशा नवी दिशा
# सार्वमत

# वांबोरीत कांदा तीन हजार रुपये

**राहुरी (तालुका प्रतिनिधी)–** सोमवार २२ जुलै रोजी वांबोरी उपबाजारात ८ हजार ८४८ कांदा गोण्याची आवक झाली. एक नंबरचा कांदा २५०५ ते ३००० रुपये, दोन नंबरचा कांदा २००० ते २५०० रुपये तर तीन नंबरचा कांदा ३०० ते २००० रुपये भावाने विकला गेला. तसेच गोल्टी कांद्याला १७०० रुपये ते २४०० रुपये भाव मिळाला. अपवादात्मक १७ गोण्यांना ३३०० रुपये, २० कांदा गोण्यांना ३२०० रुपये तर ११४ कांदा गोण्यांना ३१०० रुपये भाव मिळाला.






## महत्वाचे

### चोरीच्या गुन्ह्यातील दोघे आरोपी खेडलेपरमानंद येथून मुद्देमालासह ताब्यात

**गणेशवाडी (वार्ताहर)–** नेवासा तालुक्यातील खेडले परमानंद येथील चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीस सोनई पोलिसांनी मुद्देमालासह ताब्यात घेतले आहे. पोलीस सुत्रांकडून समजलेल्या माहितीनुसार शेतकरी संभाजी भानुदास शिंदे यांनी सोनई पोलीस ठाण्यात चोरीच्या गुन्ह्याची फिर्याद दाखल केली होती.यामध्ये गट नं. ३०२ मधील इलेक्ट्रिक मोटार स्टार्टर, लोखंडी कॉट चोरीस गेले होते. सदर गोष्टींचा तपास सोनई पोलीस ठाण्याचे सहाय्यक फौजदार अंकुश दहिफळे हे करत होते. तपास करीत असताना गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की सदरचा मुद्देमाल हा राहुरी तालुका हद्दीतील पिंपरी येथील शिवाजी शिंदे यांच्या वस्तीवर राहणार असलेल्या इसमाच्या घरी आढळून आलेले आहेत. सदरची माहिती मिळताच २२ जुलै रोजी सकाळी सोनई पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सुरज मेढे, तपास अधिकारी सहाय्यक फौजदार अंकुश दहिफळे, कॉन्स्टेबल गोरक्षनाथ जावळे, कॉन्स्टेबल मृत्युंजय मोरे यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत मुद्दे मालासह आरोपींना ताब्यात घेतले. आकाश गोरख पवार व शरद बाळासाहेब सूर्यवंशी या संशयीत आरोपींना सोनई पोलीस स्टेशनला मुद्देमालासह हजर केले. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार श्री. दहिफळे करीत आहेत.

# दहीहंडी फोडून शिर्डीत गुरूपौर्णिमा उत्सवाची सांगता

**शिर्डी (प्रतिनिधी)–** साईबाबा संस्थानच्यावतीने सुरू असलेल्या शिर्डीतील एकशे सोळाव्या गुरूपौर्णिमा उत्सवाची सोमवारी दुपारी मध्यान्ह आरती व वेदश्री वैभव ओक डोंबिवली यांच्या काल्याच्या किर्तनानंतर दहीहंडी फोडून सांगता झाली.

सोमवारी उत्सवाच्या सांगता दिनी संस्थानचे सीईओ गोरक्ष गाडीलकर व वंदना गाडीलकर यांनी समाधी मंदिरात श्रींची पाद्यपूजा केली. तर जिल्हा प्रधान न्यायाधीश तथा संस्थानचे अध्यक्ष सुधाकर यार्लगड्डा व मालती यार्लगड्डा यांच्याहस्ते गुरुस्थान मंदिरात रुद्राभिषेक पूजा करण्यात आली. काल्याच्या किर्तनानंतर साईबाबांचे समकालीन भक्त तात्या पाटील कोते यांचे वंशज राजेंद्र सुभाष कोते यांच्या हस्ते



दहिहंडी फोडण्यात आली. यावेळी संस्थानचे सीईओ गोरक्ष गाडीलकर, डेप्युटी सीईओ तुकाराम हुलवळे, जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके, मंदिर प्रमुख विष्णू थोरात, संरक्षण अधिकारी रोहिदास माळी, मंदिर पुजारी, शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यंदा प्रथमच गुरूपौर्णिमा उत्सवाला मोठी गर्दी झाली. संस्थानचे सीईओ गोरक्ष गाडीलकर व पोलीस उपअधीक्षक शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थानचे संरक्षण प्रमुख रोहिदास माळी यांनी गर्दीचे नियोजन केले. मात्र दर्शन रांगेचे नियोजन कोलमडल्याने भाविकांना दर्शन घेण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागला. संस्था सुरक्षा प्रमुख रोहिदास माळी यांनी भाविकांच्या सुरक्षेच्यादृष्टीने व्यवस्थित नियोजन केल्यामुळे कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही. साध्या वेषातील पोलीस आणि संस्थान सुरक्षा विभगाचे कर्मचारी दोन शिफ्ट मध्ये गर्दीमध्ये कार्यरत होते. परिणामी उच्चांकी गर्दी होऊनही मंदिर परिसरात तसेच रथमि रवणुकीत एकही चोरी झाली नाही.सोमवारी उत्सवाच्या सांगता दिवशी प्रसादालयात भोजनात मिष्टान्न भोजन म्हणून लापशी महाप्रसादात देण्यात आला.

- यंदा प्रथमच संस्थानचे सीईओ गाडीलकर यांनी संस्थानचे सभासद व देणगीदार असलेल्या जवळपास सव्वापाच लाख भाविकांना मेल व एसएमएस करून गुरूपौर्णिमा उत्सवात सहभागी होण्यासाठी निमंत्रण दिल्याने गुरूपौर्णिमा उत्सवाच्या गर्दीने आजवरचे रेकॉर्ड मोडित काढले. उत्सवाच्या मुख्य दिवशी दुपारपर्यंत व्हीआयपींसाठी असलेले गेट क्रमांक एक व दोन तसेच सर्व विभागांचे प्रोटोकॉल बंद ठेवण्यात आले. गावकरी, वयस्कर व चार नंबर गेटही दिवसभरात काही तासांसाठी अधुनमधून बंद ठेवण्यात आले.

# मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणीसाठी सरसावली नगरपालिकेची यंत्रणा



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणीसाठी नगरपालिकेची यंत्रणा सरसावली असून शहरातील लोकमान्य टिळक वाचनालयातील आगाशे सभागृह येथे तसेच शहरातील सर्व नगरपालिका शाळा, संजयनगर भागातील मुळे शाळा व मिनी स्टेडियम मधील नगरपालिकेच्या उपकेंद्रात योजनेचे फॉर्म विनामूल्य भरून घेतले जात आहेत.


आगाशे सभागृहामध्ये नगरपालिकेचे प्रशासक तथा प्रांत अधिकारी किरण सावंत पाटील व पालिकेचे मुख्याधिकारी सोमनाथ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या प्रमुख प्रशासकीय अधिकारी, वाचनालयाच्या ग्रंथपाल स्वाती पुरे यांच्या देखरेखीखाली त्यांची संपूर्ण टीम सदर योजनेचे फॉर्म भरणे कामी अग्रेसर आहे. यामध्ये स्वतः स्वाती पुरे, सिद्धार्थ गवारे, स्वप्निल माळवे, विजय झिंगारे, राजेश जेधे, दिशा बोरकर, साक्षी अहिरे, पूजा क्षत्रिय, राजेंद्र बोरकर हे काम करत आहेत.

महिला वर्गाचे फॉर्म भरून घेऊन जागेवरच अपलोड केले जात आहेत. त्यासाठी आगाशे सभागृहामध्ये वायफाय व राऊटर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आत्तापर्यंत या केंद्रावर ७५० पेक्षा जास्त फॉर्म भरून झाले आहेत.शहरातील इतर केंद्रातील सर्व फॉर्म येथे जमा केले जात आहेत. तसेच नगरपालिकेचे बालवाडी विभागातील कर्मचारी देखील घरोघरी जाऊन फॉर्म भरून घेत आहेत. खाजगी किंवा इतर ठिकाणी संगणकावर भरले जाणारे फॉर्मची हार्ड कॉपी येथे जमा केली जात आहे. येणाऱ्या महिला भगिनींना अत्यंत चांगली सेवा येथे मिळत असल्याने मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणींनी या केंद्रावरील कर्मचाऱ्यांना धन्यवाद दिले आहेत. शहरामध्ये काही ठिकाणी पैसे घेऊन फॉर्म भरले जात आहेत. त्यातही ओटीपी येत नसल्याने अनेकांना दोन दोन तास ताटकळत बसावे लागत आहे. त्यापेक्षा नगरपालिकेच्या आगाशे सभागृहातील केंद्रावर मोठी टीम कार्यरत असून येथे मोफत फॉर्म भरले जात आहेत तसेच वायफाय सुविधा उपलब्ध असल्याने ओटीपी वगैरे सुद्धा पटकन येत आहेत. तरी शहरातील मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणींनी या ठिकाणी येऊन आपले फॉर्म भरावेत तसेच समवेत अर्जात नमूद केल्याप्रमाणे सर्व कागदपत्रे आणावीत. जागेवर ती अपलोड केली जातात.या केंद्रावरील कर्मचारी स्वतः फॉर्म भरून घेत आहेत. तरी अद्याप भगिनींनी फॉर्म भरले नसतील त्यांनी ते त्वरित भरावेत. फॉर्म भरण्यासाठी येताना स्वतःचा मोबाईल सोबत आणावा, असे आवाहन ग्रंथपाल स्वाती पुरे यांनी केले आहे.

# अशोक आयडियल स्कुलचा राज्यस्तरीय बेस्ट इको फ्रेंडली स्कूल पुरस्काराने गौरव

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** अशोक सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखालील अशोकनगर फाटा, प्रगतीनगर येथील अशोक आयडियल स्कुलला पुणे येथील मिमांसा संस्थेद्वारे आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेत बेस्ट इको फ्रेंडली स्कूल पुरस्काराने गौरविण्यात आले असल्याची माहिती अशोक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कार्यकारी अधिकारी मंजुश्री मुरकुटे यांनी दिली.

सौ. मुरकुटे म्हणाल्या, पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेसाठी राज्यभरातील सातशे विद्यालयांनी नोंदणी केली होती. त्यातून निकष पूर्ण करणाऱ्या दोनशे निवडक विद्यालयांना त्यात सहभागी होण्याची संधी मिळाली. अशोक



आयडियल स्कूलमध्ये इको फ्रेंडली वातावरण राहण्यासाठी प्लास्टिकचा कमी वापर, मुबलक प्रमाणात वृक्षारोपण व संगोपन यासह पर्यावरण संतूलन आणि इको फ्रेंडली वातावरण निर्माण करून ते टिकविण्यासाठी सतत प्रबोधन केले जाते.

पुणे येथे आयोजित एका सोहळ्यात प्राचार्य रईस शेख यांनी संस्थेच्यावतीने मिमांसा संस्थेच्या अध्यक्षा यशोधरा दास यांच्याहस्ते पुरस्कार स्विकारला. याबद्दल प्राचार्य रईस शेख, विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर सेवकवृंद आणि विद्यार्थ्यांचे माजी आ. भानुदास मुरकुटे, मंजुश्री मुरकुटे, कारखान्याचे व्हाईस चेअरमन हिम्मतराव धुमाळ, मुळा प्रवरा वीज संस्थेचे सिध्दार्थ मुरकुटे, अॅग्रो इंडस्ट्रीजचे अध्यक्ष सोपानराव राऊत, उपाध्यक्ष बाबासाहेब आदिक, सचिव विरेश गलांडे व संचालक मंडळाने कौतुक केले आहे.

# आढाव वकील दाम्पत्य हत्याकांडातील चार आरोपींची नाशिक मध्यवर्ती कारागृहात रवानगी

**राहुरी (प्रतिनिधी)–** राहुरी येथील आढाव वकील दाम्पत्य खून खटल्यातील चार आरोपींची नाशिक कारागृहात रवानगी करण्याची राहुरी पोलिसांची मागणी सरकारी वकील उज्ज्वल निकम यांच्या प्रयत्नातून यशस्वी झाली असून पाचपैकी या चार आरोपींची रवानगी नाशिक कारागृहात करण्यात आली आहे. खून खटल्यातील पाचवा आरोपी माफीचा साक्षीदार होणार असल्याने त्याला राहुरी कारागृहातच ठेवण्यात आले आहे.

याबाबत राहुरी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राहुरी येथील अॅड. राजाराम आढाव व अॅड. मनीषा आढाव या वकिल दाम्पत्य दुहेरी हत्याकांडातील, राहुरी पोलीस



स्टेशन गु.र.नं. ७५/२०२४ सत्र न्यायालय खटला क्रमांक. १२६/२०२४ मधील आरोपी किरण नानाभाऊ दुशिंग, भैया उर्फ सागर साहेबराव खांदे, शुभम संजीत महाडीक, बबन सुनील मोरे यांना सरकारी वकील उज्वल निकम यांच्या प्रयत्नाने तसेच राहुरी पोलीस व कारागृह अधीक्षक, राहुरी यांनी केलेल्या विनंतीनुसार न्यायालयाने जिल्हाबाहेर वर्ग करण्याची परवानगी दिल्याने नाशिक मध्यवर्ती कारागृह येथे रवानगी करण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. सदर चारही आरोपींना राहुरी पोलिसांनी नाशिक मध्यवर्ती कारागृह येथे काल रोजी जमा केले आहे. तसेच आरोपी हर्षल ढोकणे हा माफीचा साक्षीदार झाल्याने न्यायालयाने त्यास राहुरी कारगृहातच ठेवण्याचे आदेशित केले आहे.

सदरची कारवाई न्यायालयाच्या आदेशाने व पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, पोलीस उपविभागीय अधिकारी बसवराज शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली पो. नि. संजय ठेंगे, पो. उपनि. चारुदत्त खोंडे, पो. हे.कॉ. बाळासाहेब महांडुळे, पो.ना. संभाजी बडे, उत्तरेश्वर मोराळे, पो. कॉ. अंबादास गीते, इफतेखार सय्यद, प्रतीक आहेर यांनी पार पाडली आहे.

# राहुरी पोलिसांनी केल्या चोरीच्या ११ मोटारसायकली हस्तगत

## बनावट नंबर प्लेट बनवून देणाराही गजाआड

**राहुरी (तालुका प्रतिनिधी)–** गेल्या काही दिवसांपासून राहुरी पोलीस ठाणे हद्दीत दुचाकी चोरीचे प्रमाण वाढले होते. याप्रकरणी गुन्हे शोध पथकाने चार जणांच्या टोळीला गजाआड केले असून या टोळीकडून चोरीच्या ११ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, राहुरी येथील गुन्हे शोध पथक या दुचाकी चोरांचा शोध घेत असताना तपासा दरम्यान पथकाला मिळालेले सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय खबऱ्या मार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक देवेंद्र शिंदे, रवींद्र पिंगळे, पोलीस उपनिरीक्षक चारुदत्त खोंडे, धर्मराज पाटील, सहाय्यक



फौजदार तुळशीराम गीते, हवालदार सुरज गायकवाड, राहुल यादव, पोलीस नाईक प्रविण बागुल, प्रमोद ढाकणे, नदीम शेख, सचिन ताजणे, गोवर्धन कदम, जयदीप बडे, अजिनाथ पाखरे, सतीश कुऱ्हाडे, अंकुश भोसले, संदीप ठाणगे, श्रीरामपूरचे मोबाईल सेलमधील पोलीस नाईक सचिन धनाड, संतोष दरेकर आदी पथकाने दोन संशयितांना त्यांच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली. त्यांनी गुन्ह्याची कबुली देऊन त्यांच्या आणखी एका साथीदाराची माहिती दिली. त्यानुसार पोलीस पथकाने बनावट नंबर प्लेट बनवून देणाऱ्या रेडियम दुकानदारासह चार आरोपींना ताब्यात घेऊन गजाआड केले. तसेच त्यांच्याकडून एकूण ११ मोटरसायकली हस्तगत केल्या आहेत. आरोपी नावेद इब्राहिम शेख, वय २३ वर्षे, रा. जातप, ता. राहुरी, मंगेश विष्णू ठाकर, वय २२ वर्षे, रा. सोमय्या फार्म, ता, राहुरी, किशोर अंकुश पवार, वय १९ वर्षे, रा. उंदीरगाव, ता. श्रीरामपूर, नावेद इब्राहिम शेख, वय २३ वर्षे, रा. जातप, ता. राहुरी, या चार जणांना गजाआड केले. तसेच बनावट नंबर प्लेट बनवून देणारा रेडियम दुकानदार जावेद रज्जाक शेख, रा. संक्रापूर, ता. राहुरी, यालाही आरोपी करून गजाआड केले. पुढील तपास सहाय्यक फौजदार आहेर करत आहेत.

# राहाता बाजार समितीत सोयाबीन ४३५१ रुपये

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** राहाता बाजार समितीत काल सोयाबीनला जास्तीत जास्त ४३५१ रुपये भाव मिळाला. काल सोयाबीनची ९ क्विंटल ची आवक झाली. सोयाबीनला ४२१६ ते ४३५१ रुपये तर सरासरी ४३०० रुपये भाव मिळाला. ज्वारीला किमान २१६५ रुपये, जास्तीत जास्त २१९५ रुपये, तर सरासरी २१८० रुपये भाव मिळाला.

हरभरा ५८७१ ते ६३७६ रुपये तर सरासरी ६१२० रुपये भाव मिळाला. मेथीला सरासरी २६०० रुपये असा भाव मिळाला. काल डाळिंबाच्या ८४०० क्रेट्सची आवक झाली. डाळिंब नंबर १ ला १७५ ते २५० रुपये प्रतिकिलोला भाव मिळाला. डाळींब नंबर २ ला १११ ते १७४ रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर ३ ला ५६ ते ११० रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर ४ ला १० ते ५५ रुपये भाव मिळाला.

नवी आशा नवी दिशा सार्वमत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक राजेंद्र कृष्णराव सोनवणे यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. एन.११, एम.आय.डी.सी, अहमदनगर येथे मुद्रित करुन प्लॉट क्र. एन. ११, एम.आय.डी.सी, अहमदनगर ४१४१११ येथे प्रसिध्द केले आहे. ● संपादक– ✻ अनंत सा. पाटील : ☎ (०२४२२) २२२४६४,२२२६२९. फॅक्स : २२२७९४. अहमदनगर कार्यालय : ☎ (०२४१) २४३११०३/०४ फॅक्स : (०२४१) २४३११०५. R.N.I Regi. No. 31816/1976. पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. रजि. नं. बी.आय.आय./आर.एन.पी./एस.आर.पी./००३/२०२१-२३ (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे)